(183)

जिल्हा परिषद, ...
...
आरोग्य
17 NOV 1993
दिनांक ...
स्वाक्षरी –
नावक नोंद वही क्रमांक ...

शासकीय /पालिका रुग्णालये यामधे, वैद्यकीय
उपचार घेतलेल्या, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या
वैद्यकीय खर्चाची देयके मंजूर करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्र. झेडपीए २३९३/११९७/प्र.क्र. ७२०/२०,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक – ६ नोव्हेंबर १९९३ –

महाराष्ट्र जिल्हा परिषद, वैद्यकीय देखभाल नियम १९६१ मधील नियम ११ नुसार, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेकडील कर्मचाऱ्यांनी शासकीय किंवा पालिका रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचारांच्या देयकांची १००% प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे.

तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय किंवा पालिका रुग्णालयात घेतलेल्या औषधोपचारांच्या देयकांची रक्कम रु. १०,०००/-चे वर असल्यास अशी देयके शासनाकडे मंजूरीसाठी पाठविली जातात. वास्तविक पहाता रु. १००००/- ची मर्यादा करण्यात आलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची मर्यादा फक्त खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या वैद्यकीय खर्चाच्या देयकांच्या प्रतिपूर्तीसंबंधी आहे. (ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. डीसीआर ४९८३/१५९०/सीआर ४९०/१७, दि. १२ जून ८४ कृपया पहावे)

सबब उपर असे पूर्णहीत असल्यास, शासकीय किंवा पालिका रुग्णालयामध्ये औषधोपचार घेतलेल्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यवाही, जिल्हा शल्यचिकित्सकांच्या सल्ल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्तरावर करावी.

[स्वाक्षरी]
(पि. टी. ठाकूर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
विभागीय आयुक्त (सर्व)
निवड नस्ती, कार्यासन क्र. २०

जा क्र – आरोग्य/.../2/303
... दि. 30/...

प्रत,
सर्व खाते प्रमुख
सर्व गट विकास अधिकारी, ... ...
कार्यवाही साठी ...

जिल्हा परिषद ...
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ...